REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.


# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हांशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख ९ नोव्हेंबर, १९३८ | अंक ४४



# किर्लोस्कर

**२५ फुटांहून खोल विहिरीसाठी किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.**

कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.

## हुगळी पंप

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा

**किर्लोस्कर बंधु लि. : : किर्लोस्करवाडी, सातारा**

**स्वतःचे मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन**
त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी

## लिमिटेड, पुणें.

**ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयींकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.**

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

# S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें १
[ माहितीपत्रक मागवा ]

# विविध माहिती

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ५ आ. ८ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं तीन कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ५ आ. ४ पै इतका पडला.

### कोर्ट्स ऑफ वॉर्ड अंमलाखालील मालमत्ता

जुलै, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी मुंबई प्रांतांतील उत्तर, मध्य आणि दक्षिण भागांतील कोर्ट्स ऑफ वार्डचे नियंत्रणाखालील इस्टेटींच्या उत्पन्न-खर्चाचे आकडे येथें दिले आहेत:—

| | उत्पन्न (रु.) | खर्च (रु.) |
|---|---|---|
| उत्तर भाग | ४,२५,०५५ | ४,१०,२६७ |
| मध्य ,, | ६,०९,१२२ | ६,४१,३९६ |
| दक्षिण ,, | २,४२,९४३ | २,५२,३६९ |

### हिंदी रेलवेजचें उत्पन्न

| | रु. कोटि | लक्ष |
|---|---|---|
| १ एप्रिल ते २० ऑक्टोबर, १९३६ | ४६ | ६० |
| १ एप्रिल ते २० ऑक्टोबर, १९३७ | ५० | ३९ |
| १ एप्रिल ते २० ऑक्टोबर, १९३८ | ५० | २५ |

### जर्मन वैमानिक कंपनीचा विस्तार

फ्रेंच, जर्मन आणि डच वैमानिक वहातुकीप्रमाणें एक जर्मन कंपनी पूर्व आशियाशीं वहातुक सुरू करणार आहे. सध्या ह्या कंपनीचीं विमानें बगदादपर्यंत येतात. पुढें पूर्वेकडे जातांना वाटेंत हिंदुस्थानमार्गे जावें लागेल आणि त्यासाठी कंपनीनें हिंदुस्थान सरकारकडे अर्ज केला आहे. बँकॉकपर्यंत जर्मन विमानें जातील आणि त्याचेपुढील चीन ओलांडून जाण्याचें काम जपानी विमानें करतील.

### मनुष्य-निर्मित सृष्टी

कॅनडामध्यें कांहीं संशोधकांनीं गव्हाची एक नवीन जात निर्माण केली आहे. हा गहूं दरसाल नव्यानें पेरावा लागत नाहीं; त्याच मुळांपासून तो पुनः फुटतो. पोर्तुगीज ईस्ट आफ्रिकेंत कायम कपास देणारें झाड एकानें तयार केलें आहे.

### मध्यप्रांतासाठी ट्रेझरी बिलें

रिझर्व्ह बँकेनें मध्यप्रांत आणि वऱ्हाड सरकारासाठी गेल्या आठवड्यांत खालीलप्रमाणें ट्रेझरी बिलें विकलीं:—

| रकम (रु.) | मुदत | पडलेला व्याजाचा सरासरी दर |
|---|---|---|
| ५५,००,००० | ८ महिने | १ रु. १५ आ. ११ पै |
| २५,००,००० | ३ महिने | १ रु. ९ आ. २ पै |

### साखरेचा उठाव

हिंदुस्थानांतील साखरेच्या कारखान्यांतील साखरेचें उत्पादन, उठाव, इत्यादिसंबंधीं सप्टेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्याविषयीं अधिकृत माहिती खाली दिली आहे:—

| | |
|---|---|
| प्रारंभींचा शिलक साठा: | २८,३१,०३० मण |
| पंधरवड्यांतील उत्पादन: | ५५ मण |
| ,, उठाव: | ८,३७,१०६ मण |
| अखेरची शिलक | १९,९३,८६९ ,, |

### मुंबई कॉर्पोरेशनचें बजेट

मुंबई कॉर्पोरेशनच्या १९३९-४० सालाबद्दलच्या बजेटांत सुमारें १३ लक्ष रुपयांची तूट येईल, असें समजतें.

### सरकारी नोकरीची मुदत ५५ व्या वर्षअखेर संपणार

५५ व्या वर्ष अखेर सर्व सरकारी नोकरांनीं सेवानिवृत्त झालेंच पाहिजे, असें संयुक्त प्रांत सरकारनें ठरविलें आहे. खालच्या दर्जाचे नोकरांस मात्र ते कार्यक्षम असेतोपर्यंत नोकरीवर ठेवलें जाईल; वरील आयुर्मर्यादा त्यांस बंधनकारक नाहीं. काटकसर, बेकारीचें अंशतः निवारण आणि पगाराच्या नवीन दरांमुळें सरकारचा होणारा फायदा हीं साधण्याकरितां वरील नियम २ जानेवारी, १९३९ पासून अंमलांत आणला जाईल.

### मेडिकल स्कूलसची आतां आवश्यकता नाहीं!

सबंध हिंदुस्थानांत मिळून, एल. सी. पी. एस. च्या तोडीचें वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या २७ शाळा आहेत. उच्च वैद्यकीय शिक्षणाचीं कॉलेजें आतां सर्वत्र स्थापन झालेलीं असल्यामुळें, ह्या शाळांची जरूरी उरलेली नाहीं असें मत व्यक्त केलें जात आहे.

### पॉवर अल्कोहोल

मुंबई प्रांतांतील साखरेच्या कारखान्यांतून सध्या वाया जात असलेल्या मोलॅसेसपासून पॉवर अल्कोहोल तयार करण्याची योजना मुंबई सरकारपुढें आहे. हैद्राबाद संस्थानांत अशा प्रकारची योजना यशस्वी झाली असून पॉवर अल्कोहोल उत्पादनास तेथें लवकरच प्रारंभ होणार आहे.

### युद्धाच्या गंडांतरांचा खर्च

झेकोस्लोव्हेकिया प्रकरणांत युद्ध जुंपलेंच तर त्याविषयींची तयारी करण्यासाठी इंग्लंड व फ्रान्स ह्या राष्ट्रांस प्रत्येकी सुमारें ३० कोटि रुपये तातडीनें खर्चावे लागले.

### इजिप्तमध्यें ब्रिटिश कापडास प्राधान्य

इजिप्त आणि ग्रेटब्रिटन ह्यांमधील व्यापारी कराराचा मसुदा तयार झाला आहे, त्या अन्वयें लँकेशायरच्या कापडाची इजिप्तमधील आयात वाढणार आहे.

### परदेशांतलि जनतेंत रेडिओद्वारां प्रचार

लंडन येथील रेडिओगृहांतून इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, स्पॅनिश आणि पोर्तुगीज भाषांतून ब्रॉडकास्टिंग करण्यांत येतें.

### आइस्क्रीमचा धंदा

ग्रेटब्रिटनमध्यें दरसाल ८० लक्ष गॅलन आइसक्रीम खपतें. आइसक्रीम बनविणारीं मोठी यंत्रसामुग्री बहुंशीं अमेरिकन आहे. विकण्यांत येणाऱ्या आइसक्रीममध्यें शेकडा किमान आठ टक्के तरी दुधांतील चरबी असली पाहिजे, अशा सरकारनें कायदा करण्याविषयीं तेथें प्रचार चालू आहे.

### मोटारीच्या बनावटींमधील पोलाद

ग्रेटब्रिटनमध्यें बनविण्यांत येणाऱ्या मोटारगाड्यांस दरसाल आठ लक्ष टन पोलाद लागतें. प्रत्येक मोटारीच्या विक्रीच्या किंमतीच्या शेकडा १० ते १५ इतकी किंमत पोलादाची असते.

### झेक गिरण्या जर्मन मुलखांत आल्या

झेक मुलखांतील कापडाच्या गिरण्यांपैकी तीन चतुर्थांश गिरण्या आतां जर्मनीचे ताब्यांत आल्या आहेत.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| २३-१०-३८ ते २९-१०-३८ | १८,२७४ |
| ३०-१०-३८ ते ४-११-३८ | ५,४४,४६२ |
| २१-९-३१ ते ४-११-३८ | ३,२१,४३,००,०५७ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५४६ | ६ कारखानदार आणि कामगार ह्यांमध्यें सलोख्याची आवश्यकता ... | ५५१ |
| २ हिंदुस्थानचें औद्योगीकरण ... ... | ५४७ | ७ ग्रेट सोशल लाइफ विमा कं० ... ... | ५५१ |
| ३ वाणसवद्याच्या धंद्यांत उमेदवारांची परीक्षा | ५४८ | ८ हिंदी बँकिंगचा आढावा | ५५२ |
| ४ हिंदुस्थानांतील वैमानिक प्रगति ... ... | ५४८ | ९ जर्मनीचे व्यापारवृद्धीसाठी प्रयत्न ... | ५५२ |
| ५ स्फुट विचार— जर्मनीच्या आफ्रिकन वसाहती--सहकारी बँकिंगचें महत्त्व--सायकलस्वार--पुण्याचें वैशिष्ट्य !--रॉकेल तेलाचा वाढता पुरवठा | ५४९ | १० मिरज स्टेट बँक लि. | ५५३ |
| | | ११ मध्यवर्ती सहकारी बँकांची घटना ... | ५५३ |
| | | १२ "पुरुषार्था"चा वेदांत अंक ... ... | ५५४ |
| | | १३ निवडक बाजारभाव | ५५५ |
| | | १४ सहकारी चळवळ ... | ५५५ |



# अर्थ

बुधवार, ता. ९ नोव्हेंबर, १९३८


## हिंदुस्थानचें औद्योगीकरण

काँग्रेस प्रधानमंडळांतील उद्योगमंत्र्यांची दिल्ली येथें परिषद् भरून बाबू सुभाषचंद्र बोस ह्यांच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानांत योजनात्मक पद्धतीनें मोठमोठे उद्योगधंदे व कारखाने काढण्यासंबंधानें ठराव मान्य करण्यांत आले. ह्या साहसात्मक व धडाडीच्या औद्योगिक धोरणाचें सर्व देशभर स्वागत झालें आहे. देशाचें दारिद्र्य नाहींसें होण्यास अनेक प्रकारांच्या संपत्तीचें उत्पादन मोठ्या प्रमाणांत स्वदेशी कारखान्यांत होणें अगत्याचें आहे ह्या सर्वमान्य मूलभूत कल्पनेस मूर्त स्वरूप देण्याचा यत्न योजिलेल्या उपक्रमानें होत असल्यानें त्याचें हार्दिक अभिनंदन होत आहे. तथापि, ह्या योजनात्मक औद्योगीकरणाचें स्वरूप कोणत्या प्रकारचें राहील आणि तें घडवून आणण्यास कोणत्या मार्गाचा अवलंब करावा लागेल ह्या गोष्टी अर्थातच अजून अनिश्चित आणि अनिर्णीत आहेत. ह्या नवीन उपक्रमाची रूपरेखा आखण्याचें काम एका समितीकडे सोपवण्यांत आलें आहे आणि तिचा अभिप्राय प्रसिद्ध होईल तेव्हां प्रस्तुत प्रश्नावर अधिक प्रकाश पडण्याचा संभव आहे. हिंदुस्थानांत औद्योगिक प्रगति झपाट्यानें होण्याचें अगत्य आणि त्यासाठी विचारपूर्वक योजना आखण्याचें महत्त्व ह्या दोन गोष्टीच आज जनतेपुढें असून त्यांचेसंबंधांत सर्वसाधारण सार्वत्रिक मान्यता मिळाली आहे एवढेंच तूर्त निश्चयानें म्हणतां येईल. काँग्रेसपक्षीय प्रधानमंडळें ज्यांत अस्तित्वांत नाहींत अशा प्रांतांतील मंत्रिमंडळांची औद्योगीकरणाच्या धोरणास सहानुभूति व पाठिंबा मिळविण्याची खटपट चालली असून ती बऱ्याच अंशांनीं यशस्वी झाली असल्याचें दिसून येत आहे. भिन्न भिन्न पक्षांच्या आणि विचारांच्या मंडळींस औद्योगिक प्रगतीचें अगत्य सारख्याच तीव्रतेनें भासत आहे हेंहि त्यावरून सिद्ध होत आहे.

औद्योगीकरणाच्या योजना आणि कार्यक्रम ह्यांची आखणी होईल तेव्हां त्यांच्या निरनिराळ्या अंगांविषयीं तपशीलवार चर्चा करावी लागून त्यांचे बाबतींत आवश्यक असलेल्या अनेक बाबींचा विचार होईल. तयार व्हावयाच्या मालाच्या खपाची शक्यता, त्याच्या उत्पादनास लागणारें भांडवल व कच्चा माल ह्यांच्या पुरवठ्याची तजवीज, परदेशीय कारखानदारांची स्पर्धा नियंत्रित करण्याची व्यवस्था इत्यादि अनेक तपशीलाच्या पण महत्वाच्या गोष्टींची तरतूद करावी लागेल. ह्या कामांत मध्यवर्ती सरकार आणि कायदेमंडळ ह्यांची सहानुभूति आणि सहाय ह्यांची आवश्यकता भासेल. पण येथें नोकरशाहीचें प्राबल्य असल्यामुळें हें सहाय तत्परतेनें मिळण्यास अडचण पडेल. संरक्षक जकातींच्या मदतीवांचून कित्येक नवीन धंद्यांची स्थापना अशक्य होईल. माल विकत घेणारी जनता आणि निरनिराळे प्रांत व संस्थानें ह्यांचे हितसंबंध ह्यांच्या संरक्षणाची काळजी घ्यावी लागेल. ह्या रीतीनें अनेक वादग्रस्त प्रश्न आणि अडचणी राष्ट्राच्या औद्योगीकरणाच्या मार्गांत उपस्थित होणें अपरिहार्य आहे. चौकशी करून औद्योगिक योजना आखण्यासाठी समित्यांची नेमणूक झाली आहे. त्यांचें कार्य कोणत्या प्रकारचें आहे ह्याची वरील विवेचनावरून कल्पना येईल. दुसरेहि तात्विक आणि वादग्रस्त प्रश्न ह्या संबंधांत उपस्थित होतील, त्यांचेंहि दिग्दर्शन करणें येथें आवश्यक आहे.

इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जपान इत्यादि देशांत उद्योगधंद्यांची प्रगति विशिष्ट परिस्थितींत झालेली आहे. आर्थिक व्यक्ति-स्वातंत्र्य आणि अनियंत्रित स्पर्धा ह्यांचें प्राबल्य जीमध्यें आहे अशा परिस्थितींत तेथें औद्योगिक उन्नति घडून आली आहे. ह्या आर्थिक घटनेस भांडवलशाही असें सामान्येंकरून नांव देण्याचा रिवाज आहे. बदलत्या काळांत ह्या पद्धतीस त्या देशांमध्यें आवश्यक तें वळण लावणें अपरिहार्य होऊन राष्ट्रीय सरकारांचा हात आर्थिक स्वातंत्र्यवादी समाजघटनेंत शिरला आहे. रशियांतील औद्योगिक घटना आत्यंतिक समाजसत्तावादाच्या तत्वावर अधिष्ठित झाली असून तेथें वैयक्तिक, आर्थिक स्वातंत्र्याचा पूर्ण अभाव आहे. योजनात्मक औद्योगिक प्रगतीचें धोरण सोव्हिअट रशियांत पद्धतशीर रीतीनें प्रथमच चालू झालें आणि त्याचें अनुकरण भिन्न परिस्थितींत व विरुद्ध विचारांच्या वातावरणांत इतर देशांमध्यें होत आहे. रशियन पद्धतीस विरोध करणाऱ्या जर्मनीमध्यें योजनात्मक पद्धतीचें औद्योगिक धोरण अंगिकारण्यांत आलें आहे. हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत ह्या तऱ्हेचें धोरण चालू व्हावयाचें असल्यास येथें रशिया, अमेरिका किंवा जर्मनी ह्यांची हुबेहूब नक्कल करण्याचा मोह आवरावा लागेल. रशियांत राजकीय व सामाजिक क्रांती झाली तशी येथें होण्याचा आग्रह धरणें अयोग्य ठरेल. त्याचप्रमाणें, इंग्लंड किंवा जर्मनी ह्यांचेंहि अंधानुकरण हिंदुस्थानांत उपयोगी पडणार नाहीं. आत्यंतिक ध्येयवादित्व औद्योगिक उन्नतीच्या व्यवहारिकत्वाच्या मार्गांत येणार नाहीं ह्याविषयीं हिंदुस्थानांत काळजी घ्यावी लागेल.नाहीं तर राजकीय घडामोडी, भांडवलशाहीस विरोध, खेडेगावी धंद्यांचा एकतर्फी पुरस्कार, औद्योगिक संरक्षणाची मागणी, आर्थिक क्रांतीची घोषणा इत्यादींच्या विचार-प्रवाहांत राष्ट्रीय आर्थिक उन्नतीचें तारूं कोणीकडे तरी भडकण्याची भीति आहे. आहे त्या परिस्थितींत औद्योगिक प्रगतीचा कार्यक्षम मार्ग एकविचारानें कसा काढावा हा बिकट प्रश्न राष्ट्राच्या पुढाऱ्यांचे पुढें आहे आणि तो शहाणपणानें त्यांस सोडवावा लागेल.

## वाणसवद्याच्या धंद्यांत उमेदवारांची परीक्षा

कोठलाहि धंदा असो, त्यांत शिरूं पहाणारांनीं व्यावहारिक शिक्षण घेऊन लायकीची परीक्षा दिली पाहिजे असा निर्बंध पाश्चात्य देशांत अधिकाधिक रूढ होत आहे. कुटुंबांतलाच धंदा करावयाचा असतां हिंदुस्थानांत त्याचें शिक्षण व अनुभव सहज मिळण्यास तरुणांस अडचण पडत नाहीं. लहानपणींच मुलांस वडिलार्जित धंद्याचें बाळकडू पाजण्यांत येतें आणि त्यांतल्या खाचाखोचा त्यांस माहीत होतात. तथापि, ही स्थिति आमच्या देशांत पालटत चालली आहे आणि नव्या व गैरमाहीत धंद्यांत तरुणांस पडावें लागत आहे. ह्या कारणानें निरनिराळ्या धंद्यांविषयींच्या व्यावहारिक शिक्षणाचें महत्त्व येथेंहि प्रतीत होत आहे. पाश्चात्य देशांमध्यें अर्थातच अशा गोष्टी अत्यंत पद्धतशीरपणें होतात, तसा प्रकार आमचे इकडे अजून चालू झालेला नाहीं. उद्योगधंदे आणि त्या संबंधानें शिक्षण ह्यांचे बाबतींत तिकडे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संघटन आहे.

वाणसवद्याचा धंदा घ्या. त्यामध्यें काम मिळवूं इच्छिणारांस इतर व्यवसायांप्रमाणें शिक्षण घेऊन परीक्षा द्याव्या लागतात ह्या गोष्टीवर अनेकांचा विश्वासहि बसणार नाहीं. किराणा माल आणि वाणसवदा ह्यांबाबतचा व्यवहार करणारांचा इंग्लंडमध्यें एक संघ आहे आणि त्याचेमार्फत परीक्षा घेतल्या जातात. गरजू मुलें रात्रीच्या शाळांत जरूर तें शिक्षण घेऊन त्या परीक्षांस बसतात. त्यांस आपल्या धंद्यांविषयींची विस्तृत व तपशीलवार माहिती असावी लागते. गिऱ्हाईकांस माल कोणकोणत्या देशांमधून येतो, त्याच्या किती भिन्नभिन्न जाती असतात आणि त्याचे गुणावगुण कोणते असतात ह्याची जिज्ञासा भासते आणि विक्री करणारास ती तृप्त करतां आली पाहिजे. लोणी किंवा तूप कोठलें आहे व कसें आहे, माल स्वदेशी आहे का परदेशी आहे, तो किती टक्के देशी आहे, इत्यादि गोष्टींची परीक्षा उमेदवारांस चटदिशीं झाली पाहिजे. ह्यासाठी त्यांची व्यावहारिक (प्रॅक्टिकल) चांचणी घेतली जाते. बिनसाखरेच्या व बिनदुधाच्या उकळलेल्या चहाचे सहा पेले उमेदवारांपुढें ठेवण्यांत येतात आणि त्यांतले चार थेंब जिभेवर टाकून त्यांस चहाची जात कोणती आहे तें ओळखतां आलें पाहिजे. गेल्या वर्षाच्या परीक्षेंत घातलेल्या प्रश्नांपैकीं कांहीं येथें उदाहरण म्हणून दिले आहेत, त्यांच्या स्वरूपावरून वर केलेल्या वर्णनाचा मथितार्थ ध्यानांत येईल:—

(१) नारळापासून तयार केल्या जाणाऱ्या पदार्थांपैकी बारांचीं नांवें सांगा.

(२) कांहीं पॅकबंद माल एक व्यापारी किरकोळीनें विकीत आहे. त्यांत भेसळ वगैरे असल्याची कायदेशीर तक्रार होऊं नये ह्यासाठी त्यानें खबरदारी कशी घ्यावी?

(३) ब्रिटिश साम्राज्यांतल्या कोणत्या देशांतून, विशेष मागणी असते तेव्हां, अधिकांत अधिक अंडीं येतात?

आपल्या इकडील दुकानदारांस कोणत्या विशिष्ट गोष्टींची माहिती असली पाहिजे आणि होतकरू उमेदवारांनीं कसल्या प्रकारच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याची तयारी केली पाहिजे ह्याची कल्पना वरील प्रश्नांवरून बसवतां येईल. त्या विषयाचा विस्तार येथें करण्याचें प्रयोजन नाहीं.

## हिंदुस्थानांतील वैमानिक प्रगति

("डायरेक्टर ऑफ सिव्हिल एव्हिएशन इन इंडिया"चा १९३७–३८ सालविषयक अहवाल)

(१) हिंदुस्थानांत १९३६ सालीं एकूण ६,४८३ मैल लांबीच्या मैलांचे रस्त्यांवर वैमानिक वहातुक चालू होती; १९३७ सालीं ह्या रस्त्यांच्या लांबींत १,८४२ मैलांची भर पडली.

(२) १९३६ सालीं हिंदी विमानांनीं ४ लक्ष, ९७ हजार मैल उड्डाण केलें; १९३७ सालीं ६ लक्ष, २२ हजार मैल अंतर त्यांनीं तोडलें.

(३) टाटा सन्स लि. नें १९३६ सालीं २,१६० मैल लांबीचे रस्त्यांवर वैमानिक वहातुकीस प्रारंभ केला; १९३७ सालीं टाटांचीं विमानें २,९६० मैल प्रवास करूं लागलीं. टाटांच्या कंपनीमधील शेकडा ९५ अधिकारी हिंदी आहेत. कराची-मद्रास पल्ल्यावर १९३६ सालीं ३६ टन टपाल नेण्यांत आलें होतें; १९३७ सालीं त्यांत ९½ टनांची वाढ झाली.

(४) मुंबई–काठेवाड वहातुकीस एअर सर्व्हिसेस ऑफ इंडिया लि. ह्या नवीन कंपनीनें प्रारंभ केला. ह्या कंपनीस काठेवाडमधील संस्थानांचें सहाय आहे. ही वहातुक पावसाळा सोडून इतर दिवसांत चालू असते.

(५) कराची ते कोलंबो विमानमार्गें टपाल नेण्याचें टाटा कंपनीनें अंगावर घेतलें आहे आणि त्याबद्दल तिनें सरकारशीं १५ वर्षांचा करार केला आहे. ५ लक्ष पौंड वजनापर्यंत टपाल वहाण्यासाठी कंपनीस दरसाल किमान १५ लक्ष रुपये मिळतात आणि ह्यापेक्षा जास्त वजन झाल्यास प्रत्येक पौंडास एक रुपया अधिक मिळतो. वरील १५ लक्ष रुपयांपैकी १०½ लक्ष रुपये हिंदुस्थान सरकार देतें आणि बाकी रकम सिलोन सरकार देतें.

(६) हिंदुस्थानांत नोकरीवर असणाऱ्या वैमानिकांपैकी आणि इतर तज्ज्ञ नोकरांपैकी शेकडा ६४ हिंदी आहेत. १९३५ आणि १९३६ सालीं हें प्रमाण अनुक्रमें शेकडा ५६ आणि ५८·५ इतकें होतें. सर्व तऱ्हेचा नोकरवर्ग हिशेबांत घेतल्यास हिंदी नोकरांचें प्रमाण शेकडा ८६·५ इतकें पडलें.

(७) हिंदुस्थानांत वैमानिक वहातुकीस प्रारंभ झाल्यापासून एकाहि उतारूस दुखापत झालेली नाहीं अगर मृत्यु आलेला नाहीं.

(८) वैमानिक सुधारणेच्या भांडवली खर्चासाठी हिंदुस्थान सरकारनें ९२ लक्ष रुपये मंजूर केले, त्यापैकीं ५२ लक्ष रुपये मार्च, १९३८ अखेर खर्च झाले.

### डॉक्टरांची शहरांत गर्दी

"हिंदुस्थानांत सुमारें तीस ते चाळीस हजार पदवीधर डॉक्टर आहेत. म्हणजे, दहा हजार लोकवस्तीस एक डॉक्टर असें प्रमाण पडलें. कांहीं शहरांत प्रत्येक हजार वस्तीमागें एक डॉक्टर असलेला आढळतो, परंतु खेडेगांवांत स्थाइक होण्यास डॉक्टर लोक तयार नसतात. ही प्रवृत्ति सर्वच शेतीप्रधान देशांत आढळते. ज्यानें उच्च शास्त्रीय शिक्षण मिळविण्यांत दीर्घ काल खर्च केला आहे असा मनुष्य जेथें सोई कमी आणि मिळकत थोडी अशा ठिकाणीं रहाण्यास तयार नसतो."–इंडियन मेडिकल सर्व्हिसच्या डायरेक्टर जनरलच्या, 'इंडियन मेडिकल रिव्ह्यू' मधील लेखांतील उतारा.

## स्फुट विचार

### जर्मनीच्या आफ्रिकन वसाहती

महायुद्धाचे अखेर झालेल्या तहाअन्वयें जर्मनीची मानहानी झाली आणि आपल्या ताब्यांतील प्रदेशास जर्मनीस मुकावें लागलें. पराभवाचे हे परिणाम पुसून टाकण्याचा पद्धतशीर यत्न आज कित्येक वर्षें जर्मनीनें चालवला असून त्यांत त्या राष्ट्रास यशहि आलें आहे. युद्धोत्तर झालेल्या व्यवस्थेची इमारत एक एक वीट काढून घेऊन ती जमीनदोस्त करण्याचा जर्मनीचा निश्चय फलद्रूप होत आहे आणि आतांपर्यंत आलेल्या यशानें हिटलरला स्फुरण चढलें आहे. व्हर्सेईचा तह धाब्यावर बसवला; राष्ट्रसंघास बलहीन केलें; जर्मनीचें लढाऊ सामर्थ्य वाढवलें; ऑस्ट्रिया घशांत टाकला, झेकोस्लाव्हेकियाचे तुकडे उडवले, मध्य युरोपांत वर्चस्व स्थापन केलें, आणि इतकेंहि करून ब्रिटिश व फ्रेंच मुख्य प्रधानांस, जर्मनीस सामोपचाराच्या गोष्टी सांगून गप्प बसण्यापलीकडे कांहीं करावयाचें हिटलरनें ठेवलें नाहीं. येथपर्यंत मिळालेल्या यशाच्या पुढची पायरी म्हटली म्हणजे जर्मनीच्या वसाहती परत हस्तगत करणें ही होय. जर्मनीची वसाहतींविषयींची मागणी सयुक्तिक नाहीं, वसाहती ताब्यांत नाहींत म्हणून जर्मनीचें कांहीं बिघडलेलें नाहीं, वसाहतींच्या तद्देशीय लोकांचें रक्षण जर्मन जुलमापासून कोण करणार, इत्यादि मुद्दे पुढें करून वसाहती परत देण्यास विरोध करण्याचें धोरण इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांतील मुत्सद्यांनीं अंगिकारलें होतें. परंतु असल्या युक्तिवादानें कोणी फसणार नाहा आणि त्यास जर्मनी दाद देणारच नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतल्या लोकांस जर्मनीची सत्ता पुन्हां आपणांजवळ यावयास नको आहे आणि टांगानिका आपल्या हातचा जाऊं नये अशी तेथील ब्रिटिशांची इच्छा आहे. जर्मनीचें समाधान करण्याचें आपलें धोरण मि. चेंबर्लेन ह्यांनीं जाहीर केलें आहे आणि हिटलरला खुष ठेवण्यासाठी आफ्रिकेंतल्या जर्मन वसाहतींची व्यवस्था काय करतां येईल ह्यांविषयीं त्यांस पच पडला आहे. जर्मन वर्चस्व वाढूं द्यावें तर तें एक प्रकारचें संकटच आहे; पण युद्धास तयार झाल्यावांचून हिटलरच्या मागणीस इंग्लंड नकार तरी कसा देणार?

### सहकारी बँकिंगचें महत्त्व

श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं गेल्या आठवड्यांत " रिझर्व्ह बँक आणि सहकारी बँकिंग " ह्या विषयावर मुंबईच्या डेक्कन मर्चंट्स को. बँकेंत व्याख्यान दिलें. हिंदी जॉइंट स्टॉक बँकांच्या शाखा आतां देशभर निघूं लागल्या असल्या तरी खेडेगांवांतील शेतकऱ्यांच्या कर्जविषयक गरजा ह्या शाखा अगर इंपीरियल बँक आणि एक्सचेंज बँका भागवूं शकत नाहींत असें त्यांनीं सांगितलें. लहान गांवांत बँकिंगचा प्रसार करण्यास मुख्यतः सहकारी बँकाच कारणीभूत झाल्या आहेत, ह्या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं आकडेवार माहिती दिली. इंपीरियल आणि जॉइंट स्टॉक बँकांचा फक्त १२०० केंद्रांत प्रवेश झालेला आहे, परंतु १५,००० ठिकाणीं सहकारी बँका असून आणखी ८५ हजार खेडेगांवीं बँका आहेत आणि त्या सर्वांचें खेळतें भांडवल १०० कोटि रुपयांवर आहे. शेतीच्या धंद्यास भांडवल पुरविण्याचे कामीं जॉइंट स्टॉक बँका उपयोगास येण्याजोग्या नसल्यामुळें शेतकऱ्यांच्या गरजा फक्त सहकारी बँकांसच व्यवस्थितपणें भागवितां येतील,हें उघड आहे. रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत सहकारी बँकांच्या व्यवहारांस आटकाठी येईल असें कांहीं नाहीं. सहकारी बँकांमार्फत हुंड्यांचें तारणावर सुलभतेनें कर्जें देणें रिझर्व्ह बँकेस कसें शक्य होईल, ह्यासंबंधीं प्रांतिक सहकारी बँकांशीं तिचा विचारविनिमय चालू आहे. श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं सांगितल्याप्रमाणें सहकारी बँकिंगची उपयुक्तता वाढविण्यास कायद्याची अडचण नाहीं; ह्याबाबत प्रयत्न करण्याची अधिकारी वर्गाची इच्छा मात्र पाहिजे. शेतकरी वर्गास कर्जाची मदत करणें रिझर्व्ह बँकेस विशेष किफायतशीर वाटत नसलें तरी जास्त व्यापक दृष्टीनें विचार करून तिनें हें काम अंगावाहेर टाकतां कामा नये.

---

### सायकलस्वार—पुण्याचें वैशिष्ट्य ?

" तुम्हांला पुण्यांत विशेष असें काय दिसलें ? " असा प्रश्न एखाद्या नवख्या पाहुण्यास केल्यास " सायकलस्वारांची गर्दी " असें उत्तर तो चटकन् देईल इतक्या मोठ्या प्रमाणांत दुचाकी गाड्यांचा वापर ह्या शहरांत फैलावला आहे अशा प्रकारची सामान्य समजूत आहे. पुण्यांतील कोणत्याहि रहदारीच्या रस्त्यावर उभें राहिल्यास दर क्षणास एखादी दुसरी सायकल समोरून गेल्यावांचून रहात नाहीं हा नेहमीचा अनुभव आहे. पंचवीस ते चाळीस हजार सायकलस्वार पुण्यांत आहेत, असा अंदाज करण्यांत आला आहे. तो वस्तुस्थितीस धरून आहे असें समजलें तरी पाश्चात्य राष्ट्रांच्या मानानें तो विशेष मोठा आहे असें नाहीं, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. दर पांच-सहा माणसांत एक सायकल हें प्रमाण विलक्षण आहे असें मानण्याचें कारण नाहीं. ग्रेटब्रिटनच्या चार–साडेचार कोटि लोकसंख्येंत एक कोटि सायकलस्वार आहेत. जर्मनीच्या सहा कोटि जनतेमध्यें दीड कोटि आहेत. फ्रान्सच्या तीन साडे-तीन कोटि लोकांमध्यें पाऊण लक्ष सायकलवाले असून इटलींत चाळीस लक्ष आहेत. अमेरिकेच्या तेरा कोटि प्रजेंत वीस ते साठ लक्ष लोकांजवळ सायकली आहेत. हे आकडे सबंध राष्ट्रांच्या सरासरीचे आहेत. निवळ शहरवासीयांचाच हिशेब केल्यास वरील प्रमाणें फार मोठीं होतील. सायकली बनवण्यांत ब्रिटिश राष्ट्राचा नंबर पहिला लागतो. गेल्या वर्षीं सव्वाआठ लक्षांच्यावर सायकली त्या देशांतून बाहेर गेल्या. जगांतील बाकीच्या सर्व राष्ट्रांनीं सायकलींच्या केलेल्या निर्गतीपेक्षाहि हा आकडा मोठा आहे. सायकलींची बनावट आणि त्यांचा निर्गत व्यापार ह्यांचे बाबतींत इंग्लंड एका पारड्यांत आणि बाकीचें सर्व जग दुसऱ्या पारड्यांत असा हा प्रकार आहे.

---

### राकेल तेलाचा वाढता पुरवठा

राकेल तेलाचा खप जगांत एवढ्या झपाट्यानें वाढत आहे कीं, त्याचा पुरवठा मागणीच्या मानानें अपुरा होईल अशी लोकांस भीति वाटूं लागली होती. आधुनिक प्रगतीचीं चक्रें ह्या तेलावांचून हालणें तर अशक्य झालें आहे. तथापि, राकेलाच्या नवीन खाणी जगाच्या निरनिराळ्या भागांत सांपडत असल्यानें ही भीति निराधार ठरत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे ह्यांत शंका नाहीं. दक्षिण अमेरिकेचा उत्तर किनारा, इराणी आखाताकडील विभाग, अरेबिया, सीरिया, पॅलेस्टाइन इत्यादि प्रदेशांत राकेल तेल सांपडत आहे. आशिया खंडांतलें राकेलचें उत्पादन गेल्या आठ वर्षांत तिपटीनें वाढलें असून एकूण जागतिक उत्पादनांत ४० टक्के वाढ झाली आहे.

## जाहीर समन्स
### पुणें येथील स्मॉलकॉज जज्ज यांचे कोर्टांत
### मुक्काम पुणें येथें

नि० ११

दिवाणी मुकद्दमा नंबर ६२९६ सन १९३८ पैकीं
दाव्याच्या निकालाचें समन्स ( आर्डर ५, कानू १, ५ )
( फार्म नंबर १, परिशिष्ट ब. शेड्युल १. ) दावा रु. ४८.

खिमा नवलाजी मारवाडी ओसवाल रा. पुणें लष्कर मालकम टँक रोड घर नं. १६८१. } वादी

विरुद्ध

उमराव वा॥ फुलखान मुसलमान रा. पुणें लष्कर मालकम टँक रोड घर नं. १६९६. } प्रतिवादी

प्रतिवादी यांस:—

ज्यापेक्षां वादी यानें तुम्हांवर पुणें लष्कर मालकम टँक रोड घर नंबर १६९६ हे भाड्यानें घेतलें आहे त्याचे भाड्याबद्दल येणें रुपये ४८ आहे त्याबद्दल दावा केला आहे, त्यापेक्षां सदरहू दाव्याचा जबाब देण्यासाठीं तारीख १२ माहे नव्हेंबर सन १९३८ रोजीं दिवसा ११ वाजतां जातीनें किंवा ज्या कोणा प्लीडरास योग्य माहिती दिली असेल व दाव्यासंबंधीं सर्व मुख्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल, किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्याबरोबर असेल अशा प्लीडराच्यामार्फत या कोर्टांत हजर होण्याविषयीं या लेखावरून तुम्हांस समन्स करण्यांत येत आहे; व तुम्हीं हजर होण्यासाठीं जो दिवस ठरविला आहे तो दाव्याच्या अखेर निकालासाठीं नेमिला आहे, यास्तव ज्यांच्या जबानीवरून व ज्या दस्तऐवजांवरून तुमच्या जबाबास बळकटी येईल असा भरवसा बाळगण्याचा तुमचा इरादा असेल तसे सर्व साक्षीदार व तसे सर्व दस्तऐवज त्या दिवशीं हजर करण्यास तुम्ही सिद्ध असलें पाहिजे.

तुम्हांस नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरीं लिहिलेल्या दिवशीं तुम्ही हजर न झाल्यास तुमच्या परोक्ष दाव्याची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

तसेंच तुम्हांस अशीहि नोटीस देण्यांत येत आहे कीं, निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तिच्यापूर्वी बजावणीसाठीं पत्ता लिहून देण्यांत तुम्हीं कसूर केल्यास तुमच्याकडे लक्ष देण्यांत येणार नाहीं.

आज तारीख ५ माहे नवंबर सन १९३८ रोजीं आमच्यां सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्क्यानिशीं दिलें.

K. P. Joshi,
रजिस्ट्रार.

शिक्का



स्त्रियांना शिवणकामाबरोबरच विणकाम, भरतकाम, काशिदा याचेंहि शिक्षण स्त्री-शिक्षकांकडून देण्याची नवीन सोय केली आहे. माहिती मागवा अगर समक्ष भेटा.

पत्ता:—जाधव टेलरिंग कॉलेज, ४९७ बुधवार चौक, पुणें २.

**Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.**

# "URBAN BANKS"

BY

L. K. Bhagwat,
*Chief Accountant,*
**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully, describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L. K. Bhagwat, Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**
**Last year 1936-37**
**Exceeds**
**2 CRORES & 82 LAKHS**

**BONUS**
**PER THOUSAND PER YEAR**
**On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( Estd. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
Manager : Bombay Branch.
Poona Office — 180, Budhwar Peth.

## कारखानदार आणि कामगार ह्यांमध्यें सलोख्याची आवश्यकता

### मुंबई सरकारचें ट्रेड डिस्प्यूट्स बिल

कोणत्याहि धंद्याची प्रगति व्हावयाची असल्यास कारखानदार आणि कामगार ह्यांचे संबंध सलोख्याचे असणें आवश्यक आहे. धंदा किफायतशीर चाळणें दोघांच्याहि हिताचें असतें. नफाबाजी करणाऱ्या कारखानदारांस आपल्या कामगारांची पिळवणूक करतां येतां कामा नये आणि मजुरांसहि धंद्याच्या नफ्यांत योग्य तो हिस्सा मिळाला पाहिजे. धंदा फायदेशीर असून तो चलतींत असतांना मजुरांस अल्प वेतन मिळणें इष्ट नाहीं आणि त्यांच्या कामाचे तासहि निष्कारण ज्यास्त असतां कामा नयेत. उलटपक्षीं, मजुरांच्या मागण्याहि कारखान्याच्या परिस्थितीस अनुसरून वेताच्या असावयास पाहिजेत. त्याचप्रमाणें, त्यांस कांहीं किमान सवलतीहि मिळणें जरूर आहे आणि त्यासाठी विशिष्ट अटी कारखानदारांवर घालण्यांत आल्या पाहिजेत. उद्योगधंद्यांच्या नफ्यांमध्यें कामगारांस योग्य प्रमाणांत वाटेकरी केल्यास औद्योगिक शांतता नांदेल आणि त्यामुळ सर्वांचेंच हित साधेल. कामगारांनीं शक्यतोंवर संपाचा अवलंब करूं नये, सलोख्यानें आणि तडजोडीनें वांध्यांचा निकाल लावण्याची शिकस्त व्हावी आणि कारखानदारांनींहि कामगारांच्या पगारांत अगर कामासंबंधीं इतर बाबतींत एकांगीपणानें हितविरोधी फेरफार घडवून आणूं नयेत. वरील उद्देशानें मुंबई प्रांतिक सरकारनें एक बिल प्रांतिक असेंब्लींत मांडलें, आणि त्याची तीनहि वाचनें आतां मंजूर झालीं आहेत.

मुंबई प्रांतांतील कारखानदार आणि कामगार ह्यांचेमधील वांध्यांमुळें गेल्या सतरा वर्षांत कामगारांचे ६१½ कोटि कामाचे दिवस बुडालेले आहेत. ह्या मुदतींत एकूण १,३१८ वांधे निर्माण झाले आणि त्यांत १९½ लक्ष कामगार सापडले. कामगारांचें स्वतःचें त्यामुळें नुकसान तर झालेंच परंतु त्याबरोबर कारखान्यांचेंहि नुकसान झालें. कारण ह्या संधीचा फायदा इतर देशांतील कारखानदारांनीं घेऊन स्पर्धा तीव्रतर केली. हे सर्व वांधे कपास कापडाच्या गिरण्यांतूनच मुख्यतः झालेले आढळतात. कामगारांमध्यें ताणून धरण्याची ताकत नसल्यामुळें, संपाचा निकाल बहुधा त्यांचेविरुद्ध होतो असा अनुभव आहे. म्हणजे, स्वतःचे कामाचे दिवस बुडूनहि अखेर कामगारांच्या स्थितींत सुधारणा घडून येत नाहीं मुंबई सरकारच्या नवीन बिलानें कामगारांचा संप करण्याचा हक्क हिरावून घेतलेला नाहीं; फक्त तो हक्क बजावण्यापूर्वी तडजोडीची आणि इतर मध्यस्तीची योजना सरकारनें तयार केलेली आहे, तिचा उपयोग कामगारांस करावा लागेल. कारखानदारांसहि मजुरांच्या परिस्थितींत प्रतिकूल फरक घडवून आणावयाचा असल्यास एकतंत्रीपणानें वागतां येणार नाहीं, अशी बिलांत तरतूद आहे.

प्रस्तुत बिल हें कामगारांच्या हिताचे विरुद्ध आहे आणि कारखानदारांची बाजू घेऊन त्यांचे हितसंबंध संभाळण्याचें सरकारचें धोरण आहे, अशा स्वरूपाची टीका कांहीं कामगार पुढाऱ्यांनीं बिलाविरुद्ध केली. तथापि, सरकार येथेंच थांबणार नसून कारखानदारांवरहि कामगारांसंबंधीं विशिष्ट जबाबदारी टाकणार आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. टेक्स्टाइल इन्क्वायरी कमिटीच्या शिफारसीप्रमाणें, सरकारनें कापडाच्या गिरण्यांतील कामगारांच्या वेतनांत वाढ घडवून आणलेली आहे. त्यांचें म्हातारपण आणि आजारीपण ह्यांकरितां तरतूद करणारें बिलहि सरकार लवकरच विधिमंडळापुढें मांडणार आहे. कामगार आणि कारखानदार ह्यांच्या हितसंबंधाचा मेळ घालून दोघांच्या सहकार्यानें उद्योगधंद्यांचें संवर्धन व्हावें आणि त्याचा फायदा दोघांसहि मिळावा अशा प्रकारचें सरकारचें धोरण आहे; कामगारांची गळचेपी करून कारखानदारांची तळी उचलून धरण्याचा सरकारचा विचार नाहीं असें त्यानें अनेक वेळां जाहीर केलेलें आहे. कारखानदार, कामगार आणि त्याचप्रमाणें सर्वसामान्य जनता ह्या सर्वांच्या दृष्टीनें उद्योगधंद्यांची प्रगति पद्धतशीर आणि अखंड होणें आवश्यक आहे आणि म्हणूनच असेंब्लीनें नुकत्याच मंजूर केलेल्या बिलास साधारण जनतेचा पाठिंबा आहे. बिलावरील चर्चेच्या वेळीं असेंब्लीमधील मजूरवर्गाच्या पुढाऱ्यांनीं कामगारांसाठीं शक्य तेथें अधिक सवलती मिळविण्याचा यत्न केला हें योग्यच झालें; परंतु सरकारनें आपलें धोरण अगोदरच निश्चित केलेलें असल्यामुळें मूळ बिलांत विशेष फेरफार घडून आले नाहींत. सरकारच्या योजनेप्रमाणें, औद्योगिक कलहांचें कारण न उरतां कामगारांची परिस्थिति किती सुधारेल, हें आजच सांगतां येणार नाहीं; त्या संबंधांतील सर्व योजनांच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाल्यानंतर ह्या प्रश्नाची पुन्हां चौकशी करावी लागेल.

---

## दि ग्रेट सोशल लाइफ विमा कंपनी, लि. जळगांव

### नामदार पाटील यांच्या हस्तें उद्घाटन समारंभ

ता. १ नोव्हेंबर रोजीं वरील कंपनीची एक शाखा येथील लक्ष्मीरोड वरील माणिक मोती मॅन्शन इमारतींत उघडण्यांत आली. अनावरण समारंभ मुंबई सरकारचे मंत्रि ना. पाटील यांच्या हस्तें झाला. ह्या समारंभास कंपनीचे डायरेक्टर श्री. मावजीशेट व श्री. कोष्टी हे हजर होते. ह्याशिवाय कंपनीचे जनरल मॅनेजर श्री. शंभूराव सरदेसाई व एजन्सी इन्स्पेक्टर, श्री. कुलकर्णी, हे मुद्दाम जळगांवहून आले होते.

आरंभीं श्री. मावजी शेट ह्यांनी सर्वांचें स्वागत केलें व उद्योगधंद्यांच्या बाबतींत त्यांतहि विम्याच्या धंद्याच्या दृष्टीनें आपलें पाऊल कसें प्रगतीच्या मार्गावर आहे आणि अजून आपल्याला फार मोठें क्षेत्र कसें काबीज करावयाचें आहे ह्याचें सुंदर विवेचन केलें. नंतर श्री. कोष्टी, दुसरे एक डायरेक्टर, यांनीं कंपनीची खालील माहिती सांगितली:—"कंपनी स्थापन होऊन पांच वर्षे झालीं. आतांपर्यंत तिचें काम ५० लाखांवर झालें असून तिचा विस्तार महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक व मद्रासपर्यंत वाढला आहे. पुणें शहरांत ह्या दोन महिन्यांत पाउण लाखांचें काम झालें असून आजच्या सुमुहूर्तावर तीस हजारांचें काम तपासण्यांत आलें आहे". यानंतर श्री. मराठे, प्रो. काळे, श्री. सरदेसाई यांचीं भाषणें झाल्यावर नामदार पाटील ह्यांचें भाषण होऊन ऑफिस उघडल्याचें त्यांनीं जाहीर केलें.

---


## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## हिंदी बँकिंगचा आढावा

( सुप्रसिद्ध ब्रिटिश साप्ताहिक 'एकॉनॉमिस्ट' ह्या पत्रांत दरसाल हिंदी बँकिंगचा आढावा प्रसिद्ध होत असतो. ह्या साप्ताहिकाच्या ताज्या अंकांत गेल्या सालाविषयीं आढावा प्रसिद्ध झाला आहे. त्याचा सारांश दरवर्षाप्रमाणें येथें देत आहों. )

मालाच्या किंमतीमधील उतरंडीच्या प्रवृत्तीचा परिणाम हिंदी बँकिंगवर झालेला दिसून येतो. जुलै, १९१४ मध्यें घाऊक भाव १०० धरल्यास तो ऑक्टोबर, १९३७ मध्यें १०४ झाला, जानेवारी, १९३८ मध्यें १०० वर आला आणि एप्रिलमध्यें आणखी खालीं जाऊन ९४ झाला. ह्याचा परिणाम अर्थातच ऑक्टोबर ते एप्रिल ह्या निर्गतीच्या मोसमावर अनिष्ट असाच घडून आला, आणि आयात–निर्गतीमधील अनुकूल तफावत १९३६-३७ सालीं ७७ कोटि रुपये होती, ती १९३७-३८ सालीं उतरून अवघी ४३ कोटि रुपयेच राहिली. सोन्याचे निर्गतीचे मानानें चांदीची आयातहि कमी झाली. परराष्ट्रीय व्यापारांतील ह्या परिस्थितीचा एप्रिल, १९३८ पर्यंत हुंडणावळीवर प्रतिकूल परिणाम झाला नाहीं, कारण रिझर्व्ह बँकेनें रुपयास १ शिलिंग ६½ पेन्स ह्या दरानें ब्रिटिश चलन विकत घेण्याचा क्रम कायम राखला होता; परंतु हा दर तिला पुढें उतरवावा लागला. १९३७-३८ मध्यें हिंदुस्थान सरकारास एकूण ३ कोटि, ७० लक्ष पौंडांची तजवीज ग्रेटब्रिटनमध्यें करावयाची होती. रिझर्व्ह बँकेनें २½ कोटि पौंडाची तजवीज केली आणि उरलेल्या रकमेची उभारणी बँकेच्या ग्रेट ब्रिटनमधील शिलकी निधीमधून तिला करावी लागली.

निर्गत व्यापारांत घट झाली, तरी अंतर्गत व्यापारी उलाढाली समाधानकारक राहिल्या. १९३६–३७ मध्यें १७६ कोटि रुपये किंमतीच्या चलनी नोटा प्रचारांत होत्या; १९३७–३८ मध्यें १८६ रुपये किंमतीच्या नोटा व्यवहारांत खेळत्या राहिल्या. शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांची रकम सप्टेंबर, १९३७ मध्यें ११२ कोटि रुपये होती, ती एप्रिल, १९३८ मध्यें १३२ कोटि रुपयांवर गेली. क्लिअरिंग हौसेस मध्यें २० अब्ज,५१ कोटि रुपये किंमतीच्या चेक्सची उलाढाल झाली. शेतीच्या मालाचे बाजारभाव पडलेले राहिले तरी कारखान्यांस गेलें वर्ष चांगलें गेलें आणि म्हणूनच शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जाचा आकडा इतका मोठा राहूं शकला. बँक रेट २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ३% कायम आहे. गेल्या वर्षी बाजारांतील व्याजाचे दरहि हलके राहिले आणि कॉल मनीचा दर ते १ टक्यांवर सहसा गेला नाहीं.

सप्टेंबर, १९३७ मध्यें शेड्यूल्ड बँकांच्या देण्यांशीं त्यांच्या रोख शिलकेचें प्रमाण शेकडा १४·६९ टक्के होते तें हळुहळु उतरत जाऊन फेब्रुवारी,१९३८ मध्यें शेकडा ८·२९ इतकें झालें. मे महिन्यांत पुनः मंदी सुरू झाली आणि हें प्रमाण पुनः वाढलें. मोसमाचे दिवसांत बँकांचा पैसा पुरे पडला आणि चलन वाढविण्याचें कारण पडलें नाहीं. आतां प्रांतिक सरकारेंहि ट्रेझरी बिलांच्या द्वारा अल्प मुदतीचीं कर्जें उभारूं लागलीं आहेत. मध्यवर्ती आणि कांहीं प्रांतिक सरकारांनीं गेल्या वर्षी व्याजाच्या अल्प दराचीं कर्जें उभारलीं. व्याजाचे दर उतरले तरी बँकांच्या नफ्यांत घट झाली नाहीं. एप्रिल, १९३७ पर्यंत पांच वर्षांपेक्षा जास्त मुदतीच्या ब्रिटिश सरकारी रोख्यांत रकम गुंतविण्याची रिझर्व्ह बँकेस मुभा होती, ती मुदत संपल्यानंतर बँकेला अल्प मुदतीच्या, कमी व्याज देणाऱ्या रोख्यांत पैसे गुंतवावे लागले आणि त्यामुळें बँकेस नफा कमी झाला. गेल्या डिसेंबरमध्यें रिझर्व्ह बँकेच्या 'ॲग्रिकल्चरल क्रेडिट' खात्यानें आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला. तथापि, सावकार आणि श्रॉफ रिझर्व्ह बँक देत असलेल्या डिस्कौंटिंगच्या सवलतींचा उपयोग अद्याप करून घेऊं लागलेले नाहींत. रिझर्व्ह बँक व्यापारी हुंड्यांच्या प्रसारास उत्तेजन देत आहे आणि ह्या दृष्टीनें अंतर्गत हुंड्यांवरील स्टँप ड्यूटी आतां उतरविण्यांत आलेली आहे. दक्षिण हिंदुस्थानांतील एका शेड्यूल्ड बँकेनें आपले व्यवहार बंद केल्यामुळें अहवालाचे सालअखेर बँकिंगचे क्षेत्रांत खळबळ उडाली. त्याची पुनरावृत्ति होऊं नये ह्यासाठी शेड्यूल्ड बँकांकडून वर्षांतून दोनदां तपशीलवार माहिती मागविण्याचें रिझर्व्ह बँकेनें ठरविलें आहे.

### जर्मनीचे व्यापारवृद्धीसाठी प्रयत्न

जर्मनी आपल्या मालाची निर्गत वाढवून इतर देशांवर आर्थिक पकड बसविण्याचा यत्न कसा पद्धतशीर करीत आहे, ह्याची कल्पना जर्मनीच्या अर्थमंत्र्यांच्या कार्यक्रमावरून येण्याजोगी आहे. त्यांच्या योजनेंतील कांहीं प्रमुख बाबी येणेंप्रमाणें आहेत:—

( १ ) इतर देशांतील व्यापारविषयक परिस्थितीचें निरीक्षण करण्यासाठी तज्ज्ञांचीं मंडळें बाहेर पाठविणें.

( २ ) इतर देशांतील उद्योगधंद्यांशीं जर्मन उद्योगधंद्यांची अनिष्ट स्पर्धा होणार नाहीं, अशी खबरदारी घेणें. म्हणजे, जर्मन मालाचे निर्गतीस फार मोठी मदत द्यावी लागणार नाहीं आणि आयात करणाऱ्या देशांत जर्मनीविरुद्ध लोकमत निर्माण होणार नाहीं.

( ३ ) माल निर्गत करणाऱ्या फर्म्सचें एकत्रीकरण करणें. म्हणजे, त्यांची आपआपसांतील स्पर्धा नाहींशी होईल.

( ४ ) जर्मन आणि इतर देशांतील व्यापारी ह्यांच्या मिश्र कंपन्या स्थापणें.

( ५ ) जर्मनीबद्दल आणि जर्मन मालाबद्दल इतर देशांत अनुकूल ग्रह निर्माण करणें.

( ६ ) वरील उद्देश साध्य व्हावा ह्याकरितां, परदेशांतील व्यापाऱ्यांस जर्मनीमध्यें फुकट रहाण्याची आणि स्वस्त प्रवासाची सवलत देणें.

( ७ ) जर्मन व्यापाऱ्यांस परदेशगमनास उत्तेजन देणें, इ.

युरोपच्या आग्नेयेकडील देशांत जर्मनी वर्चस्व प्रस्थापित करण्याचा यत्न करीत आहे. युगोस्लाव्हिया, बल्गेरिया आणि तुर्कस्थान ह्या देशांशीं दळणवळण वाढविण्यासाठी नवीन रस्ते बांधण्यांत येत असून तारायंत्रें बसविण्यांत येत आहेत. लांब मुदतीच्या कर्जांनीं ह्या देशांस बांधून घेण्याचा जर्मनीचा विचार आहे.

### देहान्त शासन कीं आमरण कारागृहवास ?

" निजाम सरकारनें कांहीं वर्षांपूर्वीं फांशीची शिक्षा रद्द केली आणि ज्यांस देहांत शिक्षा झाली असेल, त्यांस आमरण तुरुंगांत ठेवण्यांत यावें, असें ठरविलें. अशा प्रकारचे ९५ कैदी निजाम सरकारचे तुरुंगांत आहेत आणि त्यांस आतां कोणत्याच प्रकारची आशा उरलेली नसल्यामुळ ते तुरुंगांतील शिस्त स्वतः मोडतात आणि इतरांसहि ती मोडण्यास प्रवृत्त करतात. देहांत शिक्षा झालेल्यांस ३० वर्षांचा कारागृहवास पुरे असावा " अशी सूचना हैद्राबादच्या डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस ॲन्ड जेल्स ह्यांनीं केली. ती निजाम सरकारनें मान्य करून जरूर ते हुकूम सोडले आहेत.

## मिरज स्टेट बँक लि.

"दि मिरज स्टेट बँक लि. मिरज"ची वार्षिक साधारण सभा ता. १९।१०।३८ रोजीं भरली होती. चालू सालीं बँकेस रु. ९९४१–१४–२ नफा झाला व मागील साळचा नफा रु. ३४–४–२ शिल्लक राहिलेला आहे; मिळून रुपये ९९७७–२–४ ची वांटणी, डिव्हिडंडची रक्कम रुपये १२०० वजा जातां, निरनिराळे रिझर्व्ह–फंडांत केलेली आहे. बँकेचा रिझर्व्ह फंड चालू सालचा नफा वर्ग केलेला मिळून रु. ११,२००, बॅडडेट् फंड रु. ५१,००० व गव्ह. सिक्यु. फलक्युएशन फंड रु. १८,००६ मिळून सुमारें रुपये ८०,२०० रिझर्व्ह फंडास निरनिराळ्या खात्यांत मिळून जमा आहे. याशिवाय बँकेचे डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंडाची तरतूद केली असून त्यांत रु. १२०० शिल्लक आहे. चालू सालीं बँकेचे भागीदारांस द. सा. द. शे. ६ टक्केप्रमाणें डिव्हिडंड आदा केलें आहे. बँकेचें पेडअप कॅपिटल अवघें २०,००० रु. चें असून केवळ संस्थानचा पाठिंबा असल्यानें बँकेस इतका जनतेचा विश्वास संपादन करतां आला असून व्याजाचे दर कमी करूनहि ठेवींचें प्रमाण इतकें मोठें राहिलें आहे. नफ्याचा मोठा भाग बाजूस काढून ठेवण्याचें बँकेचें धोरण आहे तें प्रशंसनीय असून त्यामुळें बँकेचा आर्थिक पाया मजबूत राहून लोकांचा विश्वास वाढण्यास तें एक मोठेंच कारण होतें. या बँकेच्या प्रगतीबद्दल श्रीमंत राजेसाहेब यांचेकडे यशाचा बराच मोठा भाग जाईल यांत शंका नाहीं. बँकेची प्रगति बोर्डासहि निःसंशय भूषणावह आहे. बँकेची अशीच उत्तरोत्तर प्रगति होवो, असें आम्हीं इच्छितों.

## मध्यवर्ती सहकारी बँकांच्या घटनेंतील कांहीं दोष-स्थळें

"अर्था"च्या ता. २ नोव्हेंबरच्या अंकामध्यें वरील विषयावर "सहकारी" ह्या सहीनें एक लेख प्रसिद्ध झाला आहे. ह्या लेखांतील विचारसरणी अनेक सहकाऱ्यांस पसंत पडली असल्याचें दिसून येतें. सेंट्रल बँकांच्या डायरेक्टर बोर्डांत वरील लेखांत सुचविलेल्या सुधारणेचे संबंधांत खालील मुद्दे लक्षांत घेण्याजोगे आहेत:—

(१) डायरेक्टरांची संख्या विषम असावी.

(२) बँकेचा प्रमुख अधिकारी बोर्डाचा अधिकारपरत्वें सभासद असावा.

(३) बोर्डावरील उरलेल्या जागा व्यक्तिशः भागीदार आणि बँकेस जोडलेल्या सोसायट्या ह्यांचेमध्यें सम प्रमाणांत वाटून देण्यांत याव्या.

(४) बोर्डावरील सर्व जागा निवडणुकीनें भरल्या जाव्या; सहकारी अगर मुलकी अधिकाऱ्याचा प्रतिनिधि म्हणून कोणाची नेमणूक होऊं नये.

(५) सोसायट्यांच्या वाटणीस आलेल्या जागांपैकीं एक चतुर्थांश ते एक तृतीयांश जागा बिगर शेतकरी सोसायट्यांचे प्रतिनिधींसाठी राखून ठेवलेल्या असाव्या.

## जर्मनी आणि आयर्लंड ह्यांमधील व्यापारी करार

आयर्लंड आणि जर्मनी ह्यांमध्यें १२ महिन्यांचा एक व्यापारी करार झाला आहे. जर्मनी आयर्लंडकडून गाई, घोडे, लोणी, अंडीं, मासे, इत्यादि घेणार असून आयर्लंड जर्मनीकडून तयार माल घेणार आहे. जर्मनीनें २०० रुपयांचा माल घेतल्यास आयर्लंडनें ३०० रुपयांचा माल खरेदी करण्याचें मान्य केलें आहे.


**६ टक्के मासिक आंवक ठेव**

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर–डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**'अभिनंदनीय प्रगति'** असेच बोल नाशीकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

**सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व वर्फी वापरा**

**मोती चौक : : : सातारा**

**दि प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ अिण्डिया लिमिटेड**

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय: २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. एम् स्टेशन) बंगलूर

शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष: खानसाहेब हाजी अहमद कासम, एम. एल. सी.

मॅ. डिरेक्टर: अेस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्:** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्:** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयांपर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी:** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट, पुणें. | एच. जी. गद्रे, एजंट लक्ष्मीरोड, पुणें. २

### "पुरुषार्थ"चा "वेदांक" अंक


पंडित श्री. दा. सातवळेकर, औंध (जि. सातारा) येथें "पुरुषार्थ" मासिकाचें संपादन आणि प्रसिद्धीकरण करतात. त्यांनीं आपल्या मासिकाचा "वेदांत" अंक भेट म्हणून आमचेकडे पाठवल्याबद्दल आम्ही आभारी आहों. वेदमंत्रासारख्या पवित्र आणि प्राचीन ग्रंथांविषयीं स्वतःस आर्य म्हणवणाऱ्या लोकांस माहिती नसावी ही शोचनीय स्थिति आहे. म्हणून हिंदूंच्या संस्कृती-संबंधानें तथातथ्य माहिती देऊन जागृति आणि स्वाभिमान उत्पन्न करण्याचें महत्त्वाचें कार्य "पुरुषार्थ" करीत आहे. प्रस्तुत "वेदांका"मध्यें अनेक विद्वानांचे वाचनीय लेख आले आहेत. वेदांचे बाबतींत संशोधनास किती विपुल वाव आहे हें या लेखांवरून स्पष्टपणानें सिद्ध होत आहे आणि त्यांत दिलेली माहिती व व्यक्त केलेले विचार उद्बोधक आहेत. या अंकांत २२५ पृष्ठें असून त्याची किंमत मनीऑर्डरीनें २ रु. आणि व्ही. पी. नें २ रु. ४ आणे आहे. "पुरुषार्थ" मासिकाची वार्षिक वर्गणी ३ रु. म. ऑ. नें देऊन वर्गणीदार होणारांस वर्गणींतून हा अंक मिळेल.

### "धनुर्धारी"चा दिवाळी अंक

"धनुर्धारी" ह्या मुंबईच्या साप्ताहिकाचा दिवाळी अंक आमचेकडे भेटीस आला आहे, त्याचा आम्ही साभार स्वीकार करतों. विविध विषयांवरील मननीय लेख, लघुकथा आणि सुंदर चित्रें ह्यांनीं हा अंक नटवण्यांत आला आहे. अंक मनोरंजक आणि उद्बोधक झाला असून त्याची किंमत १२ आणे आहे.

### कोल्हापुरांतील व्यापारवृद्धि

कोल्हापूर संस्थानांतील व्यापारवृद्धीसाठी उपयुक्त सूचना करण्यासाठी महाराजांनीं नेमलेल्या कमिटीनें आपला रिपोर्ट सादर केला आहे. रावबहादूर पी. सी. पाटील हे कमिटीचे अध्यक्ष होते. तंबाखू आणि विड्याचीं पानें ह्यांकरितां स्वतंत्र मार्केट; दलाली, धर्मादायपट्टी, इत्यादींत उतार, बँक ऑफ कोल्हापूर रिझर्व्ह बँकेशीं जोडण्याची आवश्यकता; कर्जावरील व्याजाचे दरांत घट; शेतकऱ्यांकडून जामीन घेण्याच्या पद्धतीमुळें त्यांस भासणारी अडचण आणि ती दूर करण्यासाठी ह्या नियमाच्या अंमलबजावणींत सैलपणा आणण्याची जरूरी; मालाच्या वखारींत स्वच्छता; रेल्वेच्या दरांत उतार; पोस्टाच्या आणि तारेच्या सोयी, वगैरे सुधारणा कमिटीनें सुचविल्या आहेत.



### झारापकर टेलरिंग कॉलेजची नवीन शाखा

पुणें व दादर येथील झारापकार टेलरिंग कॉलेजच्या गिरगांव कॉलेजचा उद्घाटन समारंभ गिरगांव येथें आनंद निवासांत मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्याचे डे. डायरेक्टर श्री. डी. सी. गुप्ता. बी. एस. सी. (हार्वर्ड-अमेरिका) यांच्या अध्यक्षतेखाली ता. २४-१०-३८ रोजीं मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला.

(३) श्री. का. रा. झारापकर, (४) श्री. डी. सी. गुप्ता, (६) श्री. टी. व्ही. कदम.




### ना. ल. मा. पाटील यांची जाधव टेलरिंग कॉलेजास भेट

उभेः श्री. जी. बी. वर्मा, श्री. कुलकर्णी (मॅनेजर)
बसलेलेः श्री. पाटील, नामदार पाटील, प्रिन्सिपॉल जाधव.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११६–१३ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०२–१२ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—८ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९८—५ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०५—६ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९९–१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | १४५—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | १११—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४५—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११२–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३०—४ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५८२—८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२२—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १६४—६ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३४०—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४४०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १८८—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४२—० |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०–११ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३२५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०६—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६०—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | ३०४—४ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १४४५–० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. ... | ११५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०३—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९३८–१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७२२—८ |

## पुणें सेंट्रल को. बँक लि.

वरील बँकेचें भाग भांडवल ३,७०,८६० रुपये असून तिचेकडील ठेवींची रकम सुमारें ४३¾ लक्ष रुपये आहे. गंगाजळी ठेव १,१४,८६० रुपये आणि इतर फंड्स, नफ्याची शिल्लक वगैरे मिळून ३,०२,१३० रुपये आहेत, बँकेचें एकूण खेळतें भांडवल ५११/२ लक्ष रुपये आहे. बँकेचे १४½ लक्ष रुपये सोसायट्यांकडे येणें आहेत. ४¾ लक्ष रुपये इंडियन ट्रस्ट ॲक्टान्वयें गुंतविण्यांत आले आहेत आणि २६ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत आहेत. भांडवलाशीं खर्चाचें प्रमाण शेकडा १·१ इतकें पडतें. जुन्नर, सासवड, खेड, इंदापूर, दौंड व डेक्कन जिमखाना या ठिकाणीं बँकेच्या शाखा आणि फर्ग्युसन कॉलेज व ओगलेवाडी येथें उपशाखा आहेत. ठेवींपैकीं सुमारें ११ लक्ष रुपये सार्वजनिक संस्था व सहकारी सोसायटया ह्यांचे आहेत. बाकी राहिलेल्या ३२ लक्ष रुपयांपैकी पुणें शहरांतील ठेवींची रकम २५¾ लक्ष रुपये भरते. बँकेनें सेफ डिपॉझिट व्हॉल्टचा नवीन उपक्रम सुरू केला असून त्यापासून आणि सेफ कॅस्टडीचे व्यवहारापासून गेल्या सालीं बँकेस सुमारें ९०० रुपये भाडें मिळालें. मुंबई प्रांतांतील सेंट्रल बँकांत पुणें सेंट्रल को. बँकेचा दर्जा अत्यंत उच्च आहे आणि ह्या बँकेचा कारभार प्रगतिप्रिय असलेला आढळतो. श्री. के. पी. जोशी हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. द. दि. चितळे हे तिचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

## गोऱ्हे मल्टिपर्पज सोसायटी

गोऱ्हे मल्टिपर्पज सोसायटीची दुसरी साधारण सभा ता. १५।१०।३८ रोजीं श्री. आत्माराम गणेश श्रोत्री यांचे अध्यक्षतेखालीं भरली. सभेस श्री. वैकुंठराय मेहता, मुंबई प्राँ. को. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री.स्वामी आनंद, संचालक गांधी आश्रम ठाणें, श्री. आर. के. आपटे, आर्गनायझर व बँकेचे ऑफिसर्स मिळून सुमारें २०० मंडळी हजर होती. वार्षिक अहवाल मंजूर झाल्यानंतर सभेंत अनेक ठराव पास झाले. सोसायटीच्या अडचणी सेक्रेटरींनीं सांगितल्या. भाताच्या एकीकरणांत मुख्य अडचण म्हटली म्हणजे भाताकरितां कोठारें बांधणें ही होय. कोठारें बांधण्याकरितां सरकारनें दहा हप्त्यांनीं परत फेडण्याचे बिनव्याजी एक हजार रुपये द्यावेत अशी मागणी सरकारकडे करण्यांत आली. नंतर श्री. मेहता यांनीं आपल्या भाषणांत सोसायटीच्या कारभारासंबंधीं संतोष व्यक्त करून क्रेडिट सोसायटी व मल्टीपर्पज सोसायटी ह्यांतील फरक लोकांस समजावून सांगितला. या सोसायटीनें केवळ शेतकऱ्यांस पैसे न देतां त्यांच्या सर्व गरजा भागवाव्या, असें ते म्हणाले. श्री. स्वामी आनंद यांनीं आपल्या भाषणांत शेतकऱ्यांच्या दारिद्र्याबद्दल खेद व्यक्त करून शेतकऱ्यांनीं सहकारी तत्वानें वागल्यास कसा फायदा होईल याचें महत्त्व समजावून दिलें. आलेल्या पाहुण्यांचे आभार मानून झाल्यावर सभा बरखास्त झाली.

## झारापकर टेलरिंग कॉलेज

झारापकर टेलरिंग कॉलेजच्या गिरगांव ( मुंबई ) येथील शाखेचा उद्घाटन समारंभ ता. २४ आक्टोबर रोजीं मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्याचे डेप्युटी डायरेक्टर, श्री. डी. सी. गुप्ता, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना गेस्ट हाऊस

टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड–गणपति चौक–पुणें

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

अप-टु-डेट शिलाई करतां

# महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें ] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

## फराडकर टेलर्स ॲकॅडेमी

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )
येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

पाहिजेत ! खालील सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां महाराष्ट्रांत व कर्नाटकांत कांहीं ऑर्गनायझर व एजन्टस् पगारी कमिशनवर नेमणे आहेत.

## दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा | चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, लक्ष्मी रोड, पुणें २




स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )
२५।३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

पूर्वीची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें

द. म. द. शें. ४चार आणे व्याजानें
व
अनुक्रमानें रु. १०० ते २०००

देण्याची नवीन योजना. लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा. त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ४२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिसः-गिरगांव, मुंबई. ब्रँचः-लक्ष्मी रोड, पुणें नं. २

## फर्म, कंपनी आणि सोसायटी

यांचा प्रचलित कायदा काय आहे यासंबंधीं सातारचे प्रसिद्ध कायदानिपुण वकील श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांनीं लिहिलेली लेखमाला "न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः सुरू आहे. त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टाचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रांतिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं येत असलेली श्री. गजेंद्रगडकर यांची लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा.व. ट.ख. सह फक्त ५ रु; नमुना अंकासाठीं सात आण्याचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर,
"न्यायबोध" मासिक, नागपूर शहर.

व्ही. व्ही. ॲन्ड को०
जंपर स्पेशालिस्ट
लेडीज ॲन्ड जेन्टस टेलर्स,
८ निहाल पेठ (मुदलीयार रोड), पुणें शहर

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.